अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या
मान्यतेनुसार राज्यातील खाजगी संस्थांतील
व्यवस्थापन पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या
प्रवेश क्षमतेत वाढ / घट करण्यासाठी
परवानगी देण्याबाबत....

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्रशिक्षण विभाग
शासन निर्णय क्र. टिईएम-२००६/(३१६/०६)/तांशि-१,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक २९ जून, २००६

संदर्भ :-१ अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद,नवी दिल्ली यांचे दि. १५.५.२००६ चे पत्र
२ अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद,नवी दिल्ली यांचे दि.१५.६.२००६ चे पत्र

शासन निर्णय :- अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने त्यांच्या संदर्भाधीन पत्रान्वये सन २००६-०७ या शैक्षणिक वर्षात राज्यातील एम.बी.ए./एम. एम. एस./एम.सी.ए .या अभ्यासक्रमांच्या विस्तारास मान्यता देताना खालील ३ संस्थांच्या नावापुढे दर्शविल्याप्रमाणे एम.सी.ए.अभ्यासक्रमाचा समावेश केलेला नव्हता. आता अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने उपरोक्त संदर्भ क्र.२ च्या पत्रान्वये खाली दर्शविल्याप्रमाणे एम.सी.ए. पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेशक्षमतेत वाढ करण्यास परवानगी दिलेली आहे. त्यास अनुसरून याबाबत शासन आदेश निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

| अ.क्र. | संस्थेचे नांव | अभ्यासक्रम | प्रवेशक्षमता |
|---|---|---|---|
| १ | के.जे.सोमय्या इन्स्टि.इन मॅनेजमेंट स्टडीज ॲण्ड रिसर्च, विद्याविहार, पूर्व, मुंबई ४०००७७ | एम. सी.ए | ०० वरुन ६० |
| २ | अलार्ड इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट सायन्सेस, सेक्टर नं.४७ व ५०, मु.मारुंजे, ता.मुळशी, जि.पुणे ४११ ०२७ | एम. सी.ए | ०० वरुन ६० |
| ३ | विद्याभारती इन्सिट.ऑफ रिसर्च ॲण्ड पी.जी.स्टडीज, सी.के.नायडू मार्ग, कॅम्प अमरावती ४४४ ६०२ | एम. सी.ए | ०० वरुन ६० |

२. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेची सदरहू वरीलप्रमाणेची मान्यता विचारात घेऊन या शासन निर्णयान्वये वरील ३ खाजगी संस्थांतील प्रवेशक्षमतेमध्ये सन २००६-०७ मध्ये बदल करण्यासाठी परवानगी देण्यात येत आहे. व सदर मान्यता खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून देण्यात येत आहेत.

१) प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच दि. २१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटीची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील.
२) शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता तंत्रशिक्षण संचालकांच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.
३) सदर अभ्यासक्रमासाठीच्या संलग्नीकरणासाठी संबंधित संस्थेने महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ मधील तरतूदीनुसार संबंधित विद्यापीठाची मान्यता / संलग्नीकरण घेणे आवश्यक आहे.

४) संबंधित संस्थेने संचालक, तंत्रशिक्षण यांचेकडे आवश्यक ती संचीत ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.
५) सदर अभ्यासक्रमांचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार / पध्दतीनुसार करण्यात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( स्मिता द. निवतकर )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
मा. कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई
मा. कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे.
मा. कुलसचिव, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती
मा. मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांचे खाजगी सचिव
संबंधित संस्थांना
निवड नस्ती (तांशि-१)

प्रत -
१) सल्लागार (यू.जी.) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, इंदिरा गांधी खेल परिसर, इंद्रप्रस्थ इस्टेट, नवी दिल्ली ११० ००२.
२) विभागीय अधिकारी, पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रीयल इनशुरन्स बिल्डींग, दुसरा मजला, वीर नरिमन रोड, चर्चगेट, मुंबई ४०० ०२०.

C:\Documents and Settings\user\My Documents\SMITA\Private institutes\MBA MMS\K.J.S.&ALARD.doc